# कागदांच्या घड्या घालण्यातून भूमितीचा अभ्यास

भारताने जगाला शून्य या संकल्पनेची भेट दिली हे तर प्रसिद्धच आहे. पण ओरिगामी म्हणजे कागदांच्या घड्या घालून त्यातून भूमिती शिकण्याचे पहिले पुस्तक तंडलम सुंदर राव या भारतीयाने लिहिले हे फारच थोड्या लोकांना माहीत आहे.



'सम जिओमेट्रिक एक्झरसाइज इन पेपरफोल्डिंग' हे पुस्तक 1893 साली ॲडिसन आणि कंपनी, माउंट रोड, मद्रास (आताचे चेन्नई) यांनी प्रथम प्रकाशित केले.

त्या काळी ब्रिटिशांचे राज्य असल्याने टी. सुंदर राव यांचे इंग्रजीकरणाने रौ (Row) असे नाव करण्यात आले यात फारसे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. या अलौकिक बुद्धिमत्तेच्या गृहस्थाने बी.ए. ही पदवी मिळवली होती व ते तामिळनाडूत कोठेतरी उपजिल्हाधिकारी होते. त्यांच्याबाबत याहून अधिक माहिती उपलब्ध नाही.

हे पुस्तक प्रथम प्रकाशित झाले त्याला आता 125 वर्षे झाली असूनदेखील ते अद्याप उपलब्ध आहे, यावरून ते किती लोकप्रिय आहे हे लक्षात येईल. न्यू यॉर्कच्या डोव्हर कंपनीने ते 1966 साली पुनर्मुद्रित केले तेव्हापासून ते आजही मिळू शकते.